**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,**

राज्य विधानमंडळाच्या २०१४ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनामध्ये मी आपल्या सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

**२.** महाराष्ट्र शासनाने, छत्रपती शिवाजी महाराजांचे जागतिक दर्जाचे एक राष्ट्रीय स्मारक राजभवनाजवळ अरबी समुद्रात उभारण्याचा निर्णय घेतला आहे. स्मारकाची संकल्पचित्रे जगभरातील विख्यात वास्तुविशारदांकडून मागविण्यात येत असून चालू वित्तीय वर्षात ३.९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, ११० कोटी रुपये निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**३.** कोल्हापूर येथील शाहू मिलच्या आवारात राजर्षी शाहू महाराज यांचे एक भव्य स्मारक उभारण्याचेदेखील ठरविले असून कोल्हापूर महानगरपालिकेने स्मारकासाठी स्पर्धात्मक संकल्पचित्रे मागवून त्यातून सर्वोत्तम संकल्पचित्राची निवड केली आहे. स्मारकासाठी आवश्यक निधीही उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**४.** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे देशाचे स्वप्न साकार करण्यासाठी राज्य शासनाने, प्रकल्पाचे नियोजन व अंमलबजावणी करण्याकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नेमणूक केली आहे.

**५.** वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे बांधकाम ‘ बांधा मालकी घ्या वापरा व हस्तांतरित करा ’ या तत्त्वावर पूर्ण झालेले आहे. केंद्र शासनाने, कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो रेल्वे प्रकल्पाला नुकतीच मान्यता दिलेली असून ३३.५० कि.मी. लांबीच्या या संपूर्णतः भुयारी मेट्रो कॉरिडॉर प्रकल्पाचा खर्च २३,१३६ कोटी रुपये इतका अपेक्षित आहे. या प्रकल्पाचे काम २०१४-१५ मध्ये सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

**६.** राज्य शासनाने, पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात १०,५८३ कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चाच्या पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पास मान्यता दिलेली असून केंद्र शासनानेदेखील या प्रकल्पास नुकतीच मान्यता दिली आहे. त्यामध्ये, पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट ही १६.५७९ कि. मी. लांबीची मार्गिका-१ आणि वनाज ते रामवाडी ही १४.९२५ कि.मी. लांबीची मार्गिका-२ या दोन मार्गिकांचा समावेश आहे.

**७.** राज्य शासनाने, ऑटोमोटिव्ह चौक ते मिहान आणि प्रजापतीनगर ते लोकमान्य नगर या एकूण ३८.२१५ कि.मी. लांबीच्या दोन मेट्रो रेल्वे कॉरिडॉरचा समावेश असणा-या नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पालादेखील मान्यता दिलेली असून या प्रकल्पास ८६८० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**८.** मला सांगण्यास आनंद होत आहे की, मुंबईतील वडाळा ते चेंबूरपर्यंतचा भारतातील पहिला मोनो रेल्वे प्रकल्प पूर्ण झाला असून त्या मार्गावर मोनो रेल्वे सुरू झाली आहे.

**९.** माझ्या शासनाने, ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपर्यंत आहे अशा शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी ‘ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ’ ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. लाभार्थींना संपूर्ण राज्यभरातील

रुग्णालयांच्या जाळ्यामार्फत ९७१ प्रकारच्या उपचारांसाठी प्रत्येक कुटुंब प्रतिवर्ष १.५० लाख रुपयांपर्यंतची वैद्यकीय मदत मिळत आहे. २.११ कोटी लाभार्थी कुटुंबांचा समावेश असणा-या या योजनेअंतर्गत आतापर्यंत १.४९ लाख शस्त्रक्रिया पार पडल्या आहेत. ही योजना, संपूर्णपणे संगणकीकृत (ऑनलाईन) व कागदपत्रविरहित अशी आहे.

**१०.** राष्ट्रीय रक्त धोरणाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि गरजू रुग्णांना कमीतकमी वेळेत व अपेक्षित ठिकाणी वाजवी किंमतीत गुणवत्तापूर्ण आणि आवश्यक प्रमाणात रक्त उपलब्ध करून देण्याच्या हेतूने, महाराष्ट्र शासनाने ‘मागणी आधारित रक्त पुरवठा योजना’ (ब्लड ऑन कॉल) सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत १०४ हा टोल फ्री क्रमांक डायल केल्यावर शीतसाखळीत साठवलेले रक्त मोटरसायकल स्वारांमार्फत तासाभरात अपेक्षित ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येईल. ही योजना संपूर्ण राज्यभरात कार्यान्वित करण्यात आली आहे.

**११**. माझ्या शासनाने, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमान्वये राज्यात, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना १ फेब्रुवारी, २०१४ पासून सुरू केली आहे. या योजनेमध्ये, राज्यातील सुमारे ७७ टक्के ग्रामीण व ४६ टक्के शहरी लोकांचा समावेश होईल आणि सुमारे ७ कोटी लाभार्थी, ३ रुपये प्रतिकिलो या दराने तांदूळ, २ रुपये प्रतिकिलो या दराने गहू व १ रुपया प्रतिकिलो या दराने भरडधान्य यांसारखी अन्नधान्ये अर्थसहाय्यित दराने मिळण्यास हक्कदार असतील. या सुमारे ७ कोटी लाभार्थीव्यतिरिक्त, सध्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत लाभ मिळत असलेल्या सुमारे १.७७ कोटी लाभार्थीनादेखील यापुढेही प्रचलित अर्थसहाय्यित दराने अन्नधान्ये मिळण्यासाठी राज्य शासनाने १२०० कोटी रुपयांचा अतिरिक्त भार स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

**१२**. महाराष्ट्रातील हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व. श्री. वसंतरावजी नाईक यांची जन्मशताब्दी साजरी करीत असताना नागपूर येथे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केंद्र शासनाच्या संयुक्त सहकार्याने ' कृषि-वसंत ' प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन देशातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शन होते, ज्यामध्ये सुमारे ७ लाख शेतक-यांनी सहभाग घेऊन प्रगत तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती घेतली, ही आपल्या राज्यासाठी समाधानाची बाब आहे.

**१३**. लागोपाठ दोन वर्षे अपुरा पाऊस झाल्यामुळे २०१३ या वर्षाच्या सुरुवातीच्या कालावधीत महाराष्ट्राला तीव्र टंचाईच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले. या टंचाईची तीव्रता १९७२ च्या भीषण दुष्काळाइतकीच किंबहुना जास्तच गंभीर होती. पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आणि संबंधित उपाययोजना करण्यासाठी शासनाने १००० कोटी रुपये खर्च केले आहेत. तसेच, टंचाईग्रस्त जिल्ह्यांमध्ये शासनाने, चारा डेपो आणि गुरांच्या छावण्या यांवर सुमारे १४३५ कोटी रुपये खर्च केले. याप्रमाणे, राज्य शासनाने दुष्काळग्रस्त लोकांसाठी सुमारे २४३५ कोटी रुपये खर्च केले आहेत.

**१४**. २०१३ या वर्षाच्या मान्सून ऋतूमध्ये अतिपर्जन्यवृष्टी झाल्याने राज्याच्या बहुतांश भागात, विशेषतः विदर्भात पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे, जीवित व मालमत्तेची प्रचंड हानी झाली. त्यासंबंधात सर्वसमावेशक आर्थिक मदतीचे एक पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. मृत व्यक्तींचे वारसदार, मृत जनावरांचे मालक, बाधित मच्छीमार तसेच पडझड झालेली घरे, पिकांची हानी यांकरिता शासनाने भरीव मदत केली आहे. दुष्काळ व अतिवृष्टीसंबंधी करण्यात आलेल्या सर्व उपाययोजनांवर शासनाने ८००० कोटींपेक्षा जास्त रक्कम खर्च केली आहे. माझ्या शासनाच्या कल्पक व अभूतपूर्व नियोजनामुळे, आपत्ती मोठी असूनही ती परिणामकारकपणे आटोक्यात आली आहे.

**१५.** पाटबंधारे प्रकल्पांना गती देऊन अतिरिक्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी माझ्या शासनाने, नियोजन प्रक्रियेचा आढावा घेतला आहे. त्यामुळे, २००९-१० पासून आतापर्यंत ५०० प्रकल्प पूर्ण झाले असून २०१३-१४ या आर्थिक वर्षात आणखी ९० प्रकल्प पूर्ण होत आहेत.

**१६.** महाराष्ट्र शासनाने, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प हाती घेतला आहे. यामध्ये अंतर्भूत ६.४५ लाख हेक्टर लाभक्षेत्रापैकी ४.७३ लाख हेक्टर क्षेत्रावरील कालव्यांच्या पुनःस्थापनेची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. यापैकी, ४.२८ लाख हेक्टर क्षेत्रावरील सिंचन वितरण प्रणाली पाणी वापर संस्थांना कार्यक्षम सिंचन व्यवस्थापनासाठी हस्तांतरित करण्यात आली आहे. याबरोबरच, २४५ धरणांची धरण सुरक्षितता कामेही पूर्ण करण्यात आली आहेत.

**१७.** महाराष्ट्र शासन, ई-प्रशासन धोरणाच्या अनुषंगाने ‘ ई-जलसेवा ’ हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पातील सर्व ३४ मोड्युल्स कार्यान्वित झाली असून ई-जलसेवा पोर्टलमार्फत विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे नागरिकांना आता, प्रकल्पनिहाय आवर्तन कार्यक्रम, शेतक-यांना उपलब्ध असलेली पाण्याची हक्कदारी, धरणातून सोडलेला विसर्ग, पुराच्या संबंधातील इशारे, मोक्याच्या ठिकाणी पाण्याची पातळी व संनियंत्रण कक्षाबाबतची माहिती सहजपणे मिळू शकेल.

**१८.** भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ व शेतीसाठी संरक्षित सिंचनाची सोय याद्वारे दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी साखळी सिमेंट कॉंक्रीट बंधारे बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात १४८७ सिमेंट कॉंक्रीट बंधा-यांची कामे ३ ते ६ महिन्यांच्या अल्प कालावधीत पूर्ण करून १०,००० हेक्टर संरक्षित सिंचनाची निर्मिती झाली आहे. उत्साहवर्धक

निष्कर्ष आणि दृश्य परिणाम पाहता, शासनाने या कामासाठी २०१३-१४ मध्ये ६६५ कोटी रुपये एवढ्या रकमेची भरीव तरतूद केली आहे.

**१९.** विदर्भातील कापसाच्या उत्पादकतेत वाढ करणा-या केंद्र शासन पुरस्कृत ‘ विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाअंतर्गत ’ लघुसिंचन व शेतीच्या आधुनिक पद्धतींची सांगड घालून विदर्भातील शेती व्यवसायास बळकटी देण्यात येत आहे.

**२०.** राज्याच्या विशिष्ट भौगोलिक रचनेमुळे सिंचन क्षमता निर्मितीच्या मर्यादा ओळखून ‘ एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम ’ राबविण्यात येत आहे. राज्यातील ८२ टक्के कोरडवाहू क्षेत्राचा विकास होण्यासाठी पाणलोट विकसित करणे आवश्यक आहे. त्याकरिता, केंद्र शासनाने ४६ लाख हेक्टर क्षेत्रासाठी ५८२१ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पास मान्यता दिली असून या कार्यक्रमाने आता गती घेतल्यामुळे, ९८० कोटी रुपये इतकी रक्कम खर्च करून १० लाख हेक्टर क्षेत्रावर पाणलोट कार्यक्रम पूर्ण झालेले आहेत.

**२१.** एकूण १०,३३६ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या २७२ लघुसिंचन प्रकल्पांचा ‘ एकाच दिवशी एकाच वेळी ’ असा नावीन्यपूर्ण लोकार्पण सोहळा १३ जानेवारी, २०१४ रोजी संपन्न झाला आहे.

**२२.** राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत एकात्मिक कृषि विकासाकरिता सार्वजनिक-खाजगी भागीदारी हा कार्यक्रम सुरू करण्यात आला असून राज्याच्या हिश्श्यापोटी या कार्यक्रमाकरिता १०० कोटी रुपये वेगळे राखून ठेवण्यात आले होते. आतापर्यंत, नामांकित खाजगी संघटनांच्या सहभागातून एकात्मिक कृषि विकासाकरिता सार्वजनिक-खाजगी भागीदारी कार्यक्रमांतर्गत सुमारे २७९ कोटी रुपये खर्चाच्या १६ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून या प्रकल्पांचा अंदाजे १,७९,००० शेतक-यांना लाभ होणार आहे.

**२३.** राज्यात हवामान आधारित पीक विमा योजना फळ पिकांबरोबर प्रायोगिक तत्त्वावर अन्नधान्यासह इतर पिकांसाठीही लागू करण्यात आली असून शेतक-यांना या योजनेद्वारे उत्पन्नात स्थैर्य लाभले आहे.

**२४.** कोरडवाहू शेती अभियानाअंतर्गत १५० कोटी रुपयांच्या कार्यक्रमाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये, संरक्षित सिंचन सुविधा, यांत्रिकीकरण, पीक प्रात्यक्षिके, संरक्षित शेती, प्राथमिक कृषि प्रक्रिया व पणन या घटकांचा समावेश आहे. कोरडवाहू शेती अभियानाची अंमलबजावणी करण्याकरिता राज्याच्या २५ जिल्ह्यांमधील गावांची निवड करण्यात आली आहे.

**२५.** दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी आणि शेतक-यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई देण्यासाठी महाराष्ट्र राज्यात १६ खरीप व ८ रब्बी पिकांकरिता राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यात येत आहे. मागील हंगामात या योजनेमध्ये २५ लाखांपेक्षा अधिक शेतकरी सहभागी झाले होते. त्यापैकी, सुमारे ४ लाख इतक्या शेतक-यांना खरीप हंगामातील नुकसानभरपाई म्हणून कृषि विमा कंपनीकडून सुमारे २०१ कोटींची रक्कम वितरित करण्यात आली. रब्बी हंगामात सुमारे ९ लाख शेतक-यांना ५६२ कोटींची रक्कम नुकसानभरपाई म्हणून जाहीर केली आहे.

**२६.** प्रत्येक जिल्ह्यात किमान १ कृषि महाविद्यालय स्थापन करण्याच्या जाहीर धोरणानुसार, हिंगोली, नंदुरबार व सातारा या जिल्ह्यांमध्ये ३ नवीन कृषि महाविद्यालये आणि यवतमाळ येथे १ कृषि जैव-तंत्रज्ञान महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

**२७.** तांदूळ उत्पादन वाढीमध्ये दिलेल्या प्रशंसनीय योगदानाची दखल घेऊन कृषि मंत्रालय, भारत सरकार यांनी महाराष्ट्र राज्याला २०१२-१३ चा ‘ कृषि कर्मण पुरस्कार ’ प्रदान केला आहे.

**२८.** महाराष्ट्रात, ‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या’ अंमलबजावणीमध्ये उल्लेखनीय प्रगती करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत चालू वित्तीय वर्षात ९०६ कोटी रुपये खर्च झाला असून १५ लाखांपेक्षा अधिक व्यक्तींना रोजगार पुरविण्यात आला आहे. राज्यातील १८,००० ग्रामपंचायतींमध्ये या योजनेखालील कामे सुरू असून त्या कामांना गती देण्यासाठी विभागीय स्तरावर ‘सरपंच मेळावे’ आयोजित करण्यात आले आहेत. राज्यातील ‘क’ वर्ग नगरपरिषदांमध्येदेखील योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पारदर्शकता वाढविण्यासाठी विविध पावले उचलली आहेत. केंद्र शासनाच्या ‘काम मांगो’ अभियानामुळे मजुरांच्या कामांच्या मागणीमध्ये लक्षणीय वाढ दिसून आली आहे.

**२९.** जवाहर विहीर कार्यक्रमाअंतर्गत अनुज्ञेय असलेले अनुदान जानेवारी, २०१४ पासून प्रति विहीर १ लाख रुपयांहून २.५० लाख रुपये इतके करण्यात आले आहे.

**३०.** पूर्णतः नवीन व गावातील प्रथम नळपाणी पुरवठा योजनेसाठी लोकवर्गणीची अट शिथिल करण्यात आली आहे. उर्वरित सर्व नळ पाणी पुरवठा योजनांसाठी लोकवर्गणीचा लाभार्थ्यांवरील भार कमी करण्यासाठी सुधारित धोरण स्वीकारण्यात आले आहे. जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यामध्ये जलस्वराज्य-दोन हा कार्यक्रम राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

**३१.** औद्योगिकीकरणाच्या वाढीबरोबरच जलद गतीने होणा-या नागरीकरणाचा नदी जलस्त्रोतांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. बहुतांश नद्या महानगरपालिका व औद्योगिक क्षेत्र यांमधून सोडल्या जाणा-या सांडपाण्यामुळे दूषित झालेल्या असल्याने त्याचा मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होतो. नदी जल प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी व नदीच्या पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी ‘राज्य नदीसंवर्धन योजना’ हाती घेण्यात आली आहे.

**३२.** पीक कर्जाची वाढती गरज लक्षात घेऊन, २०१३-१४ या खरीप हंगामामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, वाणिज्यिक बँका आणि ग्रामीण बँका यांच्याकडून शेतक-यांना २२,८३१ कोटी रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप करण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत शेतक-यांना १ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज बिनव्याजी आणि १ लाख ते ३ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज दोन टक्के व्याजदराने उपलब्ध करून देण्यात आले असून या योजनेअंतर्गत आतापर्यंत २२० कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

**३३.** सावकारांकडून कर्जदार शेतक-यांची होणारी पिळवणूक ही माझ्या शासनासाठी अत्यंत चिंतेची बाब बनली होती. त्यावर एक उपाय म्हणून सावकारीबाबतचा जुना कायदा निरसित करून राज्यातील सावकारी व्यवहारांचे प्रभावीपणे नियमन करण्यासाठी एक पथदर्शी कायदा केला आहे. मला विश्वास वाटतो की, यामुळे अशा पिळवणुकीस निश्चितच आळा बसेल. सावकारांच्या व्यवहारांसंबंधी शासनाकडे तक्रारी दाखल करण्यासाठी आणि गा-हाणे मांडण्यासाठी एक हेल्पलाईन क्रमांकदेखील सुरू करण्यात आला आहे.

**३४.** राज्यात गेल्या काही वर्षांपासून ऊसाच्या गाळप हंगामास सुरुवात होण्यापूर्वी ऊसाला जास्त दर मिळण्यासाठी शेतक-यांच्या विविध संघटनांकडून आंदोलने केली जातात. साखर कारखान्यांना मिळणा-या उत्पन्नाच्या आधारे ऊसाचा दर सुनिश्चित करण्याची गरज व डॉ. सी. रंगराजन समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन एक व्यापक कायदा केला आहे. त्यामुळे ऊस क्षेत्रात अधिकाधिक निश्चितता, स्थिरता आणि सुसूत्रता येण्यास मदत होईल.

**३५.** महाराष्ट्र शासनाने, अलीकडेच राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ संचलित मदर डेअरी फ्रुट अँड व्हेजिटेबल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत दोन

सामंजस्य करार केले आहेत. त्यापैकी, एक करार विदर्भ व मराठवाडा भागात दूध उत्पादन वाढविण्यासाठी व दुसरा, ठाणे जिल्ह्यातील गोवे-भिवंडी येथे ५ लाख लिटरपर्यंत क्षमता असलेली व १० लाख लिटरपर्यंत क्षमता वाढवता येईल अशी अत्याधुनिक दुग्धशाळा उभारण्यासाठी आहे.

**३६.** अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या हेतूने, राज्यातील आदिवासी गावांमध्ये १५८ शाळा, २०८ रस्ते, ७४ समाजमंदिरे आणि ५३ पाणीपुरवठ्याची कामे यांसारख्या सुविधा उभारण्याकरिता वन जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर कायद्याअंतर्गत आतापर्यंत सुमारे १.५० लक्ष लाभार्थींना त्यांच्या वहिवाटीखालील एकूण ३,२१,७८८ एकर क्षेत्राचे वनपट्टे दिलेले आहेत. शेतीच्या विकासासाठी आर्थिक सहाय्यही देण्यात येत आहे. ब-याच कालावधीपासून प्रशासकीय अडचणींमुळे रेंगाळलेल्या दळीजमीनधारकांना व एकसाली जमीनधारकांना पट्ट्यांचे वाटप करण्याच्या तसेच ७३ वनग्रामे महसुली गावात रुपांतरित करण्याच्या निर्णयामुळे वनहक्क कायद्याअंतर्गत मोठ्या प्रमाणावर आदिवासी बांधवांचे वनहक्क मान्य करण्यात आले आहेत.

**३७.** मला हे सांगण्यास आनंद होत आहे की, राज्यातील संपूर्ण वन क्षेत्रांच्या सीमांचे संगणकीकरण करण्यात आले असून, शासनाच्या संकेतस्थळावर सर्व संगणकीकृत नकाशे उपलब्ध आहेत. ते नकाशे जीआयएसच्या प्लॅटफॉर्मवरदेखील ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून दिले आहेत. वनविषयक अपराधांची नोंद, वन्य प्राण्यांची ये-जा आणि वनरोपणाच्या जागांचे व्यवस्थापन यांकरिता सर्व वन रक्षकांना व्यक्तिगत संगणकीय सहाय्य पुरविण्यात येत आहे.

**३८.** सागरी क्षेत्रामधील पर्यावरणीय संवर्धनाच्या संबंधातील एक बांधिलकी म्हणून, १२,००० हेक्टर इतके खारफुटीचे क्षेत्र राखीव व संरक्षित वनांखाली

आणण्यात आले असून १०० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रांवर खारफुटीच्या लागवडीचे कामदेखील हाती घेण्यात आले आहे.

**३९.** राज्याने, ‘सुवर्णजयंती राजस्व अभियानाअंतर्गत’ ४,५०,००० पेक्षा जास्त दाखले शिबिरांच्या माध्यमातून दिले असून त्याची देशपातळीवर नोंद घेण्यात आली आहे. ३०,००० कि.मी. पेक्षा जास्त शेतरस्त्यांची अतिक्रमणे दूर करण्यात आली असून, ग्राम अभिलेखात ६,८५,००० इतक्या फेरफार नोंदी घेण्यात आल्या आहेत.

**४०.** महसूल प्रशासनाला गतिमान करण्याकरिता आणि नागरिकांना जलद सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात ६७ नवीन उपविभागांची रचना करण्यात आली असून, ते कार्यान्वितही करण्यात आले आहेत.

**४१.** महाराष्ट्र शासनाने, शुल्क प्रदानाच्या निर्गमनद्वारामार्फत (ग्रास) मुद्रांकशुल्क व नोंदणी फी स्वीकारणारी एक अभिनव योजना देशात प्रथमच सुरू केली आहे. यामुळे राज्यातील जनतेला सुरक्षित व सुलभ सेवा मिळेल. ई-रजिस्ट्रेशन या नवीन प्रणालीद्वारे दुय्यम निबंधक कार्यालयात न जाता घरबसल्याच दस्तांची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**४२.** माझ्या शासनाने, कुळकायद्याअंतर्गत जमिनीचा मालकीहक्क प्राप्त होऊन १० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे अशा प्रकरणात जमीन विक्रीसाठी परवानगीची अट काढून टाकल्याने लाखो शेतक-यांना दिलासा मिळाला आहे.

**४३.** संघ लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणा-या भारतीय प्रशासकीय सेवा व राज्य प्रशासकीय सेवा, या स्पर्धा परीक्षांकरिता राज्यातील ८ विद्यापीठे व २ प्रशिक्षण संस्थांमार्फत अनुसूचित

जमातीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धापूर्व परीक्षेचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**४४.** आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांकरिता स्वतंत्र शिक्षण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. शासनाने, राज्यातील ५५६ अनुदानित आश्रमशाळांमधील मुलींच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक आश्रमशाळेत एक महिला-अधीक्षक व एक पहारेकरी अशी एकूण १११२ पदे निर्माण केली आहेत.

**४५.** महाराष्ट्राला पुरोगामी विचारांची व सामाजिक सुधारणांची थोर परंपरा लाभली आहे. या विचारसरणीतून, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत एक पथदर्शी कायदा केला आहे.

**४६.** शिक्षण, नोकरी व निवडणूक यांमधील आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्रांची पडताळणी करून मिळण्याची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी शासनाने सध्याच्या समित्यांसह जिल्हावार जात पडताळणी समित्या स्थापन करण्याचे ठरविले आहे.

**४७.** केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय धोरण जाहीर केले आहे. त्याच धर्तीवर राज्य शासनानेदेखील राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर केले असून त्यामुळे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित व पर्याप्त वैद्यकीय सोयींसह प्रतिष्ठापूर्वक जीवन जगता येईल.

**४८.** सतत पुरोगामी दृष्टिकोन जोपासणा-या महाराष्ट्राने महिलांचा सर्वांगीण विकास आणि त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्याचे तिसरे ‘ महिला धोरण ’ जाहीर केले आहे. या धोरणामध्ये, महिलांच्या सक्षमीकरणासाठी

राज्य शासनाच्या बांधिलकीचे प्रतिबिंब दिसते. मला सांगण्यास आनंद होत आहे की, या धोरणाची केंद्र शासनाकडून प्रशंसा करण्यात आली आहे.

**४९.** बलात्कार, लैंगिक अत्याचार किंवा ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना आर्थिक सहाय्य देणे व त्यांचे पुनर्वसन यांकरिता राज्य शासनाने, ‘ मनोधैर्य योजना ’ सुरू केली आहे. महिलांविरुद्ध हिंसाचाराची गंभीर व सामाजिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने, शासनाने आतापर्यंत ८७ समुपदेशक केंद्रे स्थापन करून ती कार्यान्वितही केली आहेत.

**५०.** मुलींचे शिक्षण व त्यांच्या आरोग्यविषयक दर्जात सुधारणा करणे, बालविवाह व स्त्री-भ्रूणहत्या रोखणे तसेच मुलींचा जन्मदर वाढविणे, यांसाठी राज्यात ‘ सुकन्या योजना ’ सुरू करण्यात आली असून त्याअंतर्गत मुलीच्या नावे २१,२०० रुपयांची रक्कम गुंतविण्यात येईल आणि मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यावर तिला एकूण १ लाख रुपये इतकी रक्कम देण्यात येईल.

**५१.** एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना, आयुर्विमा महामंडळाच्या विमा योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आले असल्यामुळे सेवानिवृत्तिनंतर त्यांना किंवा त्यांच्या मृत्यूनंतर कायदेशीर वारसांना, अंगणवाडी सेविकांच्या बाबतीत १ लाख रुपये आणि मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्याबाबतीत ७५,००० रुपये मिळणार आहेत.

**५२.** शासन, सच्चर समितीच्या शिफारशी व माननीय पंतप्रधानांचा १५ कलमी कार्यक्रम राबविण्यास कटिबद्ध आहे. राज्यातील अल्पसंख्याकांची सामाजिक-आर्थिक उन्नती व शैक्षणिक विकास साधण्यासाठी, इतर योजनांसह मौलाना आझाद मोफत शिकवणी व संलग्न योजना, मदरसे आधुनिकीकरण योजना, उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणा-या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता

शिष्यवृत्ती, प्रत्येक जिल्ह्यामध्ये अल्पसंख्याक विद्यार्थिनींकरिता वसतिगृहे, रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम, यांसारख्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात आली आहे.

**५३.** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियमाची राज्यामध्ये यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात आली आहे.

**५४.** राज्यातील कायम विनाअनुदान तत्वावरील उच्च माध्यमिक शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना कायम अनुदानावर आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेला असून १ एप्रिल, २०१४ पासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल. या निर्णयाचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची गळती रोखण्यासाठी होणार आहे.

**५५.** राज्यात, २०१३-१४ मध्ये शासनाकडून ५ हजार अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा उपलब्ध करण्यात आल्या असून आतापर्यंत एकूण ८ हजार माध्यमिक शाळांमध्ये अशा प्रयोगशाळा आहेत.

**५६.** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शासनाकडून मागील ३ वर्षांत सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांसाठी ११.५२ लाख डेस्क-बेंच पुरविण्यात आले आहेत.

**५७.** इयत्ता ११ वी व १२ वीच्या स्तरावर पर्यावरण शिक्षण हा विषय नव्याने सुरू करण्यात आला असून त्यामुळे, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण होण्यास व त्याद्वारे पर्यावरण संरक्षण व संवर्धनास मदत होणार आहे.

**५८.** राज्यात, पुणे व नागपूर येथे भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था (आयआयआयटी) भागीदारी तत्वावर सुरू करण्यासाठी मान्यता दिली असून, यासाठी प्रत्येकी १६५ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

**५९.** शासनाने, शासकीय महाविद्यालयांमध्ये मानसेवी प्राध्यापक व गुणश्री (इमेरिटस्) प्राध्यापकांची नेमणूक करण्याचे ठरविले असून त्यामुळे, वेगवेगळ्या क्षेत्रांमधील तज्ज्ञ व्यक्तींचा अंतर्भाव होण्यास तसेच त्यांच्या सर्वसमावेशक ज्ञानाचा फायदा करून घेण्यास मदत होईल.

**६०.** मुंबई, औरंगाबाद व नागपूर या ठिकाणी महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठांची स्थापना करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबत कायदाही केला आहे. यामुळे, विधिविषयक शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी होऊन प्रशिक्षण व संशोधन यांस चालना मिळेल.

**६१.** माता मृत्यूदर कमी करण्यात महाराष्ट्राने लक्षणीय यश मिळविले आहे. सद्यस्थितीत देशातील माता मृत्यूदर प्रति १ लाख प्रसूतींमागे २१२ असून महाराष्ट्रात तो १०४ इतका आहे. महाराष्ट्राला, नवजात शिशु मृत्यूदर, ५ वर्षांखालील बाल मृत्यूदर व अर्भक मृत्यूदर कमी करणे तसेच सुरक्षित प्रसूती याबाबत राष्ट्रीय स्तरावरील ४ पारितोषिके मिळालेली आहेत, हे भूषणावह आहे.

**६२.** राज्यातील एकूण १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपैकी १० महाविद्यालयांमध्ये २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने प्रत्येकी ५० याप्रमाणे एकूण ५०० विद्यार्थी क्षमता वाढीस मान्यता दिलेली आहे. यामुळे, राज्यातील जनतेला जास्त प्रमाणात वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल.

**६३.** राज्यातील गडचिरोली, गोंदिया आणि चंद्रपूर या नक्षलग्रस्त जिल्ह्यांमधील नक्षलप्रभाव कमी करण्यात राज्य पोलीस दलाने यश मिळविले आहे. २०१३-१४ या वर्षात,या भागातील नक्षलविरोधी कृतींना बळ देण्यासाठी व जनतेचा विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने जनजागरण मेळावे आणि ग्रामभेटी आयोजित करण्यात येत आहेत. नवसंजीवन प्रकल्पाअंतर्गत,

अधिकाधिक नक्षलवाद्यांशी संवाद साधून त्यांनी आपली शस्त्रे टाकून द्यावीत यासाठी प्रयत्न सुरू आहेत. परिणामी, ४९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. नक्षलग्रस्त आदिवासी भागातील शाळकरी मुलांना नागरी भागाची ओळख करून देण्यासाठी ‘आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजना’ नावाची एक नवीन योजना सुरू केली आहे. विशेष पायाभूत योजनेअंतर्गत, विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या असून तटबंदी असलेली पोलीस ठाणी उभारण्याचे ठरविले आहे.

**६४.** नागरिकांना पुरेशी सुरक्षितता व सुरक्षा पुरविण्यासाठी राज्य पोलीस दलात ५ टप्प्यात, ५ वर्षांत, सुमारे ६१,४९१ नवीन पदांची निर्मिती करण्याचे शासनाने ठरविले असून त्यापैकी पहिल्या टप्प्यात १२,३७९ पदांच्या निर्मितीसाठी नुकतीच मंजुरी दिली आहे.

**६५.** टॅक्सी व्यवसायात महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच प्रवाशांना अधिक सुरक्षिततेची जाणीव होण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्रात महिलांची फोन फ्लिट टॅक्सी योजना कार्यान्वित केली आहे.

**६६.** शासनाने, रद्द झालेल्या, सुप्त किंवा संपुष्टात आलेल्या ऑटोरिक्षा परवान्यांचे दोन टप्प्यात पुनर्वितरण करण्याचे ठरविले असून पुढील प्रक्रिया सुरू आहे.

**६७.** महाराष्ट्राला, देशातील सर्वाधिक परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करणे शक्य झाले आहे. भारत सरकारच्या औद्योगिक धोरण व प्रचालन विभागाकडे आलेल्या औद्योगिक प्रस्तावांच्या एकूण गुंतवणुकीपैकी सर्वाधिक १८ टक्के वाटा एकट्या महाराष्ट्राचा असून, १०,२१,६३३ कोटी इतकी गुंतवणूक आहे.

**६८.** अधिकाधिक औद्योगिक गुंतवणुकीला आकर्षित करून इतर राज्यांच्या स्पर्धेत अग्रेसर राहण्यासाठी तसेच, राज्यात रोजगाराच्या जादा संधी उपलब्ध करून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने, प्रोत्साहन पॅकेज योजनेअंतर्गत ‘ अल्ट्रा मेगा प्रकल्प ’ हा एक विशाल प्रकल्पाचा संवर्ग निर्माण केला आहे. या विशाल प्रकल्प धोरणाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला असून या धोरणाअंतर्गत महाराष्ट्र शासनाने ३,२१,०९१ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ३.५७ लाख व्यक्तींना रोजगार देणा-या ४०३ विशाल प्रकल्पांना मान्यता दिली आहे. या ४०३ विशाल प्रकल्पांपैकी ११४ प्रकल्पांत निर्मिती होत आहे.

**६९.** महाराष्ट्र राज्य हे, आधार ओळखपत्राची नोंदणी करण्यामध्ये अग्रेसर आहे. आतापर्यंत ८.७ कोटींपेक्षा अधिक नागरिकांनी आधारसाठी नोंदणी केली असून सुमारे ८.२ कोटी नागरिकांची आधार ओळखपत्रे तयार झाली आहेत. देशामध्ये ही संख्या सर्वाधिक असून, या कामगिरीबद्दल महाराष्ट्राला एकूण १० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत.

**७०.** राज्य शासनामध्ये कागदविरहित कार्यालयाची संकल्पना राबविण्यासाठी महाराष्ट्रात ई-कार्यालय या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ई-कार्यालयाचा वापर करणा-या कार्यालयांपैकी मंत्रालय हे देशातील सर्वात मोठे कार्यालय गणले गेले आहे. माझे शासन, ई-प्रशासनाचे लाभ स्थानिक भाषेत राज्यातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कटिबद्ध आहे. सर्व संकेतस्थळांवरील मुखपृष्ठ मराठीमध्ये असण्यावर भर दिला जात असून अधिकाधिक आशय मराठीत उपलब्ध झाल्यामुळे जास्तीत जास्त लोकांना त्याचा वापर करणे शक्य होईल. मराठीत प्रशिक्षण, संशोधन व आशय विकसित करणे यावर लक्ष केंद्रित करून शासनाने सी-डॅक बरोबर एक सांमजस्य करारही केला आहे. शासकीय योजनांची कार्यक्षम व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या

दृष्टीने, सर्वेक्षण व लेखापरीक्षा, शासन निर्णय शोध व महान्यूज यांसह मोबाईल ॲप्लिकेशन्स विकसित केली आहेत.

**७१.** महाराष्ट्र राज्याने मागणीनुसार १०० टक्के वीज उपलब्ध करून देण्याची क्षमता निर्माण केली आहे. २००८-०९ मध्ये, महाराष्ट्रात १८०० उपकेंद्रे होती, त्यांची संख्या आता २६८० एवढी झाली आहे. गेल्या ५ वर्षांमध्ये, वितरण रोहित्रांच्या संख्येत २,७१,७६६ एवढी वाढ झाली आहे. राज्यातील वीज ग्राहकांची संख्या १.५६ कोटींहून २.१७ कोटींपर्यंत वाढली आहे.

**७२.** महाराष्ट्रात गेल्या ५ वर्षांमध्ये, एकूण ६० लाख इतक्या घरगुती, कृषि, वाणिज्यिक व औद्योगिक वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर असून आतापर्यंत ३९.१९ लाख कृषि पंपांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

**७३.** गेल्या ५ वर्षांमध्ये महाजेनकोने औष्णिक क्षमतेत २००० मेगावॅटची व सौर ऊर्जा क्षमतेत १३० मेगावॅटची भर घातली आहे. याशिवाय, राज्याच्या विविध भागांमध्ये वीज उभारणी प्रकल्पांचे काम वेगाने सुरू आहे.

**७४.** एकाच ठिकाणी असलेला भारतातील सर्वात मोठा सौर ऊर्जा प्रकल्प महाजेनकोने साक्री, जिल्हा धुळे येथे मार्च, २०१३ मध्ये कार्यान्वित केला असून,१२५ मेगावॅट क्षमता असलेल्या या प्रकल्पातून नियमितपणे वीज निर्मिती सुरू झाली आहे. आशिया खंडातील या प्रकारच्या प्रकल्पांपैकी हा एक अग्रगण्य प्रकल्प आहे.

**७५.** पुनर्वापरयोग्य ऊर्जा स्त्रोतांचा विकास करण्यासाठी हरित ऊर्जा निधी स्थापन करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे. दुर्गम भागातील गावांचे पुनर्वापरयोग्य ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचा कार्यक्रम व्यापक प्रमाणात हाती घेण्यात आला आहे.

**७६.** इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळात १,६७,५२४ कामगारांची नोंदणी झालेली असून मंडळाकडे जानेवारी, २०१४ अखेरपर्यंत १८२१ कोटी रूपये इतका उपकर जमा झालेला आहे. नोंदणी झालेल्या बांधकाम कामगारांसाठी मंडळातर्फे विविध योजना राबविण्यात येत आहेत.

**७७.** घरेलु कामगारांसाठी मंडळ स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये २,४९,५०८ इतक्या घरेलु कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे. विविध योजनांबरोबर ५५ वर्षे व त्यावरील वयाच्या घरेलु कामगारांना प्रति वर्ष १०,००० रुपये ‘सन्मान धन’ देणारी योजना लागू करण्यात आली आहे.

**७८.** शासनाने,बांधकाम कामगार व घरेलु कामगार यांच्या पाल्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने लॅपटॉप आणि टॅबलेट वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

**७९.** शिक्षणाद्वारे सामाजिक बदल घडवून आणण्याच्या हेतूने, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामध्ये नोंदणी केलेल्या कामगारांच्या पाल्यांसाठी पहिल्या टप्प्यात ३२ केंद्रांवर विदेशी भाषेचे वर्ग सुरू करण्यात आले असून, ऑक्टोबर, २०१३ पासून सुरू झालेल्या पहिल्या टप्प्यात एकूण ७८२ लाभार्थी आहेत. जानेवारी, २०१४ पासून सुरू झालेल्या दुस-या टप्प्यात ४८ केंद्रांमध्ये सुमारे १२०० लाभार्थी आहेत. सर्व इच्छुक पाल्यांना कौशल्य संपादन करणे शक्य व्हावे म्हणून त्यांना इंग्रजी, फ्रेंच, रशियन, जापानी, चिनी, जर्मन इत्यादी भाषांचे शिक्षण देण्याचे प्रस्तावित असून त्याचा लाभ विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी तसेच पुरेसा रोजगार मिळविण्यासाठी होणार आहे.

**८०.** शासन, नागरिकांना जलद गतीने न्याय मिळवून देण्यास व त्यासाठी पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे. अलीकडे मुंबई येथील उच्च न्यायालयात ई-कोर्ट कार्यान्वित करण्यात आले आहे. महिलांवरील

लैंगिक अत्याचाराचे व अन्य अपराधांचे खटले, जलद व विशेष महिला न्यायालयांमार्फत निकालात काढण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी योजना तयार करण्यात आली असून तिचे अत्यंत चांगले परिणाम दिसून आले आहेत.

**८१.** राज्य शासनाने 'एकात्मिकृत गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम' प्रकल्पातील वाढीव खर्च भागविण्यासाठी ९२ स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र निवारा निधीमधून २५० कोटी रुपयांचे वित्तीय सहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे झोपडपट्टी रहिवाशांकरिता ४०,००० पेक्षा जास्त निवासी गाळे पूर्ण होतील. माझे शासन, राजीव आवास योजना राबविण्यासाठी कटिबद्ध असून भारत सरकारने, राज्यातील सर्व महानगरपालिकांचा समावेश असलेल्या एकूण ४६ स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांच्या प्रारंभिक निवडीस मान्यता दिलेली आहे.

**८२.** राज्य शासन, मुंबईतील गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असून, म्हाडा, पुढील टप्प्यात ११ आजारी किंवा बंद पडलेल्या कापड गिरण्यांकडून उपलब्ध झालेल्या २.८४ हेक्टर जमिनीवर सुमारे ३००० घरांचे बांधकाम हाती घेणार आहे.

**८३.** मला सांगण्यास आनंद होत आहे की, माननीय राष्ट्रपती महोदयांनी महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) या विधेयकाला अधिसंमती दिली आहे. गृहनिर्माण नियामक प्राधिकरण स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. यामुळे विकासकांकडून देण्यात येणा-या जाहिरातींमधील विसंगती दूर होईल, तक्रारींचे निवारण होईल आणि गृहनिर्माण क्षेत्रातील व्यवहारांत पारदर्शकता व शिस्त येईल तसेच गैरव्यवहारांना आळा बसेल.

**८४.** शासनाने नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले असून वस्त्रोद्योग क्षेत्रात आतापर्यंत सुमारे १२,००० कोटी इतकी गुंतवणूक आकर्षित केली आहे व १ लाखापेक्षा अधिक नवीन रोजगार निर्मिती यातून अपेक्षित आहे.

**८५.** राज्य शासनाने, पेसा अधिनियमाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. अनुसूचित क्षेत्रांतील वाड्या किंवा वस्त्यांना गाव म्हणून घोषित करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात नुकतीच सुधारणा केली असून पेसा अधिनियमाखाली नियमदेखील प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. यामुळे अनुसूचित क्षेत्रांमध्ये राहणा-या आदिवासी लोकांच्या रुढी व परंपरांचे जतन होईल व शासन प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढेल.

**८६.** इंदिरा आवास योजनेअंतर्गत अधिक दर्जेदार घरकुले बांधण्यासाठी राज्य शासनाने प्रति घरकूल खर्चाची मर्यादा ७०,००० रुपयांवरुन १ लाख रुपये इतकी वाढविली आहे.

**८७.** मला हे नमूद करण्यास आनंद होत आहे की, संपूर्ण भारतभर मार्गदर्शक ठरेल असा ई-पंचायत प्रकल्प, अभियान पद्धतीने राबविण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. ई-उपक्रमशिलतेच्या बाबतीत देशातील इतर राज्यांनी महाराष्ट्र राज्याचे अनुकरण करावे या हेतूने, भारत सरकारने महाराष्ट्र राज्याला एक आदर्श राज्य म्हणून प्रस्तुत केले आहे. याशिवाय ग्रामपंचायतीमधील ‘ संग्राम ’ केंद्रामार्फत नागरिकांना त्यांच्या राहत्या गावातच बँक व्यवहाराशी निगडित सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रमदेखील हाती घेतला आहे.

**८८.** शासनाने, तालुका व जिल्हा मुख्यालय येथील ८६ प्रशासकीय इमारतींचे बांधकाम पूर्ण केले असून यासाठी ३४५ कोटी रुपये खर्च केले आहेत. सुमारे ४९० कोटी रुपये खर्चाची ७७ प्रशासकीय इमारतींची बांधकामे प्रगतिपथावर आहेत.

**८९.** केंद्रीय रस्ते निधी योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील गडचिरोली व गोंदिया या नक्षलप्रभावित जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला असून भारत सरकारने या जिल्ह्यांमध्ये अंदाजे ८१० कोटी रुपये खर्चाच्या २९ कामांना मंजुरी दिलेली आहे.

**९०.** राज्यातील २.४२ लाख कि.मी. रस्त्यांपैकी ४४८४ कि.मी. रस्ते, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या माध्यमातून 'बांधा वापरा व हस्तांतरित करा' या तत्वावर विकसित करण्यात आले आहेत. आतापर्यंत ६७ पथकर स्थानके (टोल-नाके) बंद झालेले आहेत. सार्वजनिक खाजगी सहभागातून राबवावयाच्या प्रकल्पांच्या धोरणामध्ये एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीने सार्वजनिक खाजगी सहभाग पथकर धोरण राज्यशासनाच्या विचाराधीन आहे.

**९१.** माझ्या शासनाने, रंगभवन खुले नाट्यगृह, धोबी तलाव, मुंबई या ठिकाणी एक भव्य असे 'मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र' बांधण्याचा निर्णय घेतला असून, १०,१७५ चौ.मी. बांधकामासाठी ८०.२० कोटी रुपयांच्या अंदाजित खर्चाला मंजुरी दिली आहे.

**९२.** शासनाने, मराठी भाषेच्या विकासासाठी कार्य करणा-या कार्यालयांमार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या ५०० प्रकाशनांची ई-पुस्तके तयार करण्याचा निर्णय घेतला असून दरवर्षी १ मे ते १५ मे हा कालावधी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा करण्याचादेखील निर्णय घेतला आहे.

**९३.** साहित्यिक, सामाजिक व ऐतिहासिक मूल्य असणा-या अतिदुर्मिळ अशा ९५६ ग्रंथांचे जतन व संवर्धन करण्यासाठी डिजिटायझेशन करण्याचा व त्यांना शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

**९४.** तामीळ विद्यापीठ, तंजावूर येथे उपलब्ध असलेली सामाजिक, शैक्षणिक व ऐतिहासिक विषयांवरील तसेच साहित्य व संस्कृती यांच्याशी संबंधित मोडी लिपीतील मौल्यवान हस्तलिखिते देवनागरी लिपीत रुपांतरित करण्यात येत असून सुमारे ४,००,००० हस्तलिखितांपैकी ६५,००० हस्तलिखितांचे काम पूर्ण झाले आहे.

**९५.** महाराष्ट्रातील पर्यटन व जागतिक वारसास्थळांना आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी आदर्श पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्धी मिळवून देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. राज्यातील पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने टाईम्स स्क्वेअर, न्यूयॉर्क येथे सप्टेंबर, २०१३ मध्ये ‘ दिवाळी महोत्सवाचे ’ आयोजन केले होते. त्यामुळे, महाराष्ट्राच्या संस्कृतीला व पर्यटनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देण्याचे कार्य झाले आहे.

**९६.** जागतिक वारसा म्हणून घोषित केलेल्या अजिंठा व वेरुळ लेण्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांमध्ये प्रसिद्ध आहेत. या लेण्यांचे महत्त्व लक्षात घेऊन, केंद्र व राज्य शासनाच्या सहाय्याने अजिंठा-वेरुळ संवर्धन व विकास प्रकल्पाअंतर्गत लेण्यांच्या प्रतिकृती निर्मितीचे कार्य पूर्ण झाले असून, सप्टेंबर, २०१३ पासून पर्यटकांसाठी ते खुले करण्यात आले आहे.

**९७.** माझ्या शासनाने,दीर्घकाळ प्रलंबित असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयात राज्याची बाजू खंबीरपणे व स्पष्टपणे मांडण्याकरिता नामांकित वकिलांची नियुक्ती केली आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी माझे शासन कटिबद्ध असल्याचा मी पुनरुच्चार करतो. परिणामकारक समन्वयासाठी, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाची जाण असलेल्या एका वरिष्ठ अधिका-याची नेमणूकदेखील करण्यात आली आहे.

**९८.** सन्माननीय सदस्यहो, विद्यमान अधिवेशनाच्या कालावधीमध्ये वर्ष २०१३-१४ च्या पूरक मागण्या, वर्ष २०१४-१५ साठीचा अंतरिम अर्थसंकल्प, लेखानुदान आणि इतर तातडीचे शासकीय कामकाज आपल्यापुढे विचारार्थ मांडण्यात येईल.

या अधिवेशनातील आपल्या सर्व विचारविमर्शास मी सुयश चिंतितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र!!**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई